

रजि. नं. महा/४३१/२०१६
एफ. १७९८६, (सांगली)

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

## येळवी, ता. जत, जि. सांगली.

# ANNUAL REPORT 2023-24

1 April 2023 to 31 March 2024



रजि. नं. महा/४३१/२०१६ एफ. १७९८६, (सांगली)

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

## येळवी, ता. जत, जि. सांगली.

संस्थेचा इतिवृत्त.....

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था गेली ३० वर्षे होऊन अधिक काळ कला क्रीडा सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत आहे यामध्ये संस्थेच्या वतीने लोकसहभागातून स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाची स्थापना, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबिरे आज, एस.टी महामंडळाचे 'स्मार्ट कार्ड' योजना, कन्यारत्न ठेव योजना, माजी सैनिक ,सैनिक पत्नी, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांचा सन्मान सोहळा, महिला दिन, जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षा, प्रबोधनात्मक व्याख्यानमाला, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पॅन कार्ड, आधारकार्ड, रेशन कार्ड शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, विविध महापुरुषांची जयंती, सांस्कृतिक कार्यक्रम अशी विविध लोकोपयोगी समाज उपयोगी कामे संस्थेच्यावतीने करण्यात आली आहेत .

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन, केरळ पूरग्रस्तांसाठी संस्थेकडून मदत, आरोग्य शिबिरा अंतर्गत अनेक गरजूंना मोफत औषध उपचार, 'श्रीं' च्या प्रतिष्ठापनेने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, पाणी फौंडेशनमध्ये संस्थेचा सक्रिय सहभाग व सहभागाबद्दल प्रशस्तीपत्र, लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम, पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणासाठी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियमची स्थापना, स्पर्धात्मक परीक्षेसाठी विशेष वर्गाची व्यवस्था. ओंकार स्वरूपा या संस्थेने केंद्र सरकारने ग्रामीण व गरीब गरजू जनतेसाठी 'आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना' चे गोल्डन कार्ड तयार करण्यासाठीच्या शिबिराचे आयोजन.

फॅशन डिझायनिंग कोर्स ५० महिलांना तीन महिन्याकरिता मोफत प्रशिक्षण.

कोरोना काळात विधवा परितक्त्या, एकल महिलांना मोफत दोन महिने पुरेल इतके किराणा साहित्य.

कोरोना संकटकाळात वन विभाग व कृषी विभागांमध्ये गावातील ५० बेरोजगार नागरिकांना रोजगार हमीच्या कामातून काम मिळवून दिले व त्याची रक्कम रुपये रोजगार ३ लाख रूपये त्या लोकांना रोजगार मिळवून दिला.

आमच्या संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मा. अनिल अंकलगी साहेब यांच्या संकल्पनेतून ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज साकार होत आहे. ग्रामीण भागात इंग्रजीचे ज्ञान विद्यार्थ्यास मिळावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाढत्या स्पर्धेच्या युगात पुढे जाण्यासाठी व आवश्यक असलेले शिक्षण मिळावे म्हणून या प्रशालेची सुरुवात करण्यात आलेली आहे. व त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलींना सायन्ससाठी परगावी न जाता आपल्याच गावात शिक्षण मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अंकलगी साहेबांनी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची स्थापना केली.

केंद्र शासनाच्या जिल्हास्तरीय उत्कृष्ट संस्था पुरस्काराने संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे. विविध शासकीय योजनाची माहिती बद्दल संस्थेला जत तहसील कार्यालय यांच्याकडून प्रशस्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा सैनिक बोर्ड सांगली यांच्याकडून सैनिकांचा सन्मान सोहळा आयोजित केल्याबद्दल गौरव पत्र देऊन संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे.

**संतोष माणिकराव पाटील**
सचिव : ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था
मो. ९१३००२३३०७

१. संस्थेची माहिती ........................................................................................ 03
२. कराटे प्रशिक्षण दिले ... क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ... ..............................................04
३. महापुरुष जयंती व सांस्कृतीक कार्यक्रम ... ........................................................ 05
आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडी ...
४. वाहन परवाना शिबीर व सडक सुरक्षा जीवन रक्षा अभियान ... .............................. 06
५. यशस्वीतांचा सत्कार व नवागतांचे स्वागत ... स्वातंत्र्यदिन साजरा करताना ... .......07
६. रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करताना ... वन भोजन - एक शैक्षणिक उपक्रम ... 08
७. तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन ... ............................................... 09
८. गणेशोत्सव साजरा ... नवरात्रोत्सव, येळवी ... आंतरशालेय क्रीडा स्पर्धा ... ............ 11
९. फॅन्सी ड्रेस कॉम्पिटीशन ... शैक्षणिक सहल ... ..................................................... 12
१०. अभ्यास दौरा ... प्रजासत्ताक दिन साजरा ... निरोप समारंभ ... ............................... 13
११. ओंकार स्वरुपा फेस्टिव्हल ... ........................................................................ 14
इयत्ता १० वीचा निरोप समारंभ ...
१२. संक्रांतीनिमित्त - महिला गटशेती विषयी माहिती ... .............................................. 15
'किंडरगार्टन' कार्यक्रम संपन्न ... समर व्हेकेशन, MS-CIT कोर्स ... ....................... 16

# संस्थेची माहिती ...

संस्थेचे आधारस्तंभ



**मा. अनिल अंकलगी**

संस्थेचे अध्यक्ष



**मा. दिपक (आण्णा) अंकलगी**

संस्थेचे सचिव



**मा. संतोष पाटील**
ग्रा.प. सदस्य, येळवी.

'बळ एकीचे... नाते माणूसकीचे', हेच ब्रीद वाक्य घेऊन मागील ३० वर्षांपासून ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था काम करत आहे.

ओंकार स्वरुपा ही केवळ एक संस्था नाही तर एक व्यासपीठ आहे. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सहकाऱ्यांशी समन्वय साधून सहकाऱ्यांच्या सहकार्याने एक रचनात्मक कार्य करावे हा मुख्य हेतू ठेवून संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

संस्थेच्या या जडणघडणीत अनेकांचा वाटा आहे. सर्वांच्या सहकार्याच्या जोरावरच संस्थेने आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत 'माणूसकी हाच धर्म' मानून कार्य केलेले आहे.

संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत येळवी सह पंचक्रोशीतील नागरीकांसाठी अनेक समाजोपयोगी, लोकोपयोगी कार्य केले आहे. यामध्ये तालुक्यातील खेळाडूंसाठी कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले, MS-CIT कोर्सची सुरुवात केली, फॅन्सी ड्रेस कॉम्पिटीशन, महिलांसाठी गटशेती विषयक मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले, वाहन परवाना शिबीर व सडक सुरक्षा जीवन रक्षा अभियान याबरोबर महापुरुष जयंती व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. असे अनेक नवनवीन उपक्रम राबवून माणूसकीचं नातं आणि एकीचं बळं निर्माण केलेलं आहे...

आज या संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. लहानापासून थोरापर्यंत... येळवीसह पंचक्रोशीतील नागरिकांना संस्था आपलीशी वाटू लागते यामध्ये सारे आले.

सर्व सन्माननीय सदस्य, पदाधिकारी व कर्मचारी वृंद

## कराटे प्रशिक्षण दिले ...



ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये आज कराटे या खेळाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.... तसेच या खेळापासून होणारे फायदे.... कराटे या खेळापासून शैक्षणिक क्षेत्रातील भविष्यातील संधी... महिला व मुली कराटे खेळापासून संरक्षण कशा करू शकतात याची माहिती कराटे प्रशिक्षक विजय तिकोटी सरांनी दिले...



## क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ...







# महापुरुष जयंती व सांस्कृतीक कार्यक्रम ...

ओंकार स्वरूपातर्फे महापुरुष जयंती व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न.....

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेतर्फे दिनांक 21/4/2023 ते 23/4/2023 रोजी भव्य डे- नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते या स्पर्धेचे उद्घाटक युवा नेते आमदार पुत्र मा.धैर्यशील (दादा) सावंत यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी माजी उपसरपंच सुनील अंकलगी, सोसायटीची संचालक मा. सचिन माने संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी ,सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील हे उपस्थितीत होते.....

या स्पर्धेत 24 संघानी सहभाग नोंदवला होता प्रथम क्रमांक:- महाराणा प्रताप ग्रुप येळवी, द्वितीय क्रमांक:- ओंकार स्वरूपा ग्रुप येळवी, तृतीय क्रमांक :-एम .एस. ई. बी. ग्रुप जत, तर उत्तेजनार्थ :- एन,एस.पी.एल ग्रुप लोहगाव या संघाने पटकावला.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन येळवीच्या लोकनित्क्त महिला सरपंच सौ.आरती अंकलगी यांच्या हस्ते करण्यात आले तसेच महापुरुष जयंती उत्सवाचे फोटो पूजन शिवनेरी कन्स्ट्रक्शन चे मालक मा. दरयाप्पा (आप्पा)जमदाडे यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी पंचक्षरीता (काका) अंकलगी, उपसरपंच मा. विश्वास खिलारे, येळवी सोसायटी चेअरमन संतोष स्वामी,रविकिरण पवार, डॉ. विवेक स्वामी ,शंकर (तात्या) आवटे, प्राचार्य मा.नंदकुमार खंडागळे (सर) ,बाळासो चव्हाण, लिंबाजी सोलनकर, राजू कदम, नवनाथ पवार, तुकाराम सुतार, आदी उपस्थित होते.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत श्री महाद्वार स्वामी सेवा भजनी मंडळ, महाद्वार रोड कोल्हापूर यांचा भजन व सोंगी भारुडाचा बहारदार कार्यक्रमाने, येळविकारांची मनी जिंकली, भजन व सोंगी भारुडाने लोकांचे मनोरंजन करत संपूर्ण वातावरण भक्तीमय करून सोडले....







## आषाढी एकादशी निमित्त पायी दिंडी ...





ओंकार स्वरूपातर्फे आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडी सोहळा संपन्न.....

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज वतीने दिंडी सोहळ्याच्या आयोजन केले होते. आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या लोकोत्सव आणि संस्कृतीची प्रतिक आहे.विद्यार्थ्यांनी खांद्यावर पताका घेऊन जय हरी विठ्ठल नामाच्या घोशात नामस्मरण करत विविध प्रात्यक्षिके करून दाखवली.

## वाहन परवाना शिबीर व सडक सुरक्षा जीवन रक्षा अभियान ...

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेच्या वतीने ड्रायव्हिंग लायसेन्स नोंदणी व जनजागृती कार्यक्रम..... सडक सुरक्षा जीवन रक्षा अभियान

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रायव्हिंग लायसेन्स नोंदणी व जनजागृती कार्यक्रम (two व्हीलर आणि four व्हीलर) ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी येथे आयोजित करण्यात आला होता.

सदर कॅम्प मध्ये 40 युवकांची व महिलांची कच्ची लायसन काढून देण्यात आली. सदर कॅम्प ग्रामीण भागात येळवी येथे आयोजित केल्याने अनेक युवकांची व महिलांची सोय झाली याबद्दल अनेक युवकांनी समाधान व्यक्त केले. सदर कॅम्प पूर्णपणे मोफत घेण्यात आला असून यासाठी आर.टी.ओ. एजंट मा. सोमनिंग चौगुले यांचे सहकार्य लाभले....





## यशस्वीतांचा सत्कार व नवागतांचे स्वागत ...





ओंकार स्वरूपा तर्फे यशस्वीतांचा सत्कार व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन...

आज ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज येळवी येथे कु. स्नेहल तानाजी चव्हाण यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा अंतर्गत पोलीस उपनिरीक्षक P.S.I पदी निवड झाल्याबद्दल तसेच कु. औदुंबर प्रकाश नरळे यांची PSU मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमधून क्लास वन ऑफिसर पदी निवड झाल्याबद्दल ओंकार स्वरूपातर्फे सत्कार करण्यात आला ..

यावेळी स्नेहल चव्हाण मॅडम म्हणाल्या विद्यार्थ्यांनी अभ्यास करून कष्ट करून जिद्दीने व चिकाटीने यश प्राप्त करावे, परिस्थिती कोणत्याही यशाला आडमार्ग ठरू शकत नाही. अथवा आपल्याला शिक्षण घेण्यापासून रोखू शकत नाही. आयुष्यात अनेक संकटे येतात आपण स्थिर राहणे महत्त्वाचे आहे. येळवी सारख्या ग्रामीण भागात ओंकार स्वरूपाच्या माध्यमातून इंग्रजीचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत आहे. याचा उपयोग विद्यार्थ्यांना करून घेतला पाहिजे आसे सांगितले.तसेच औदुंबर नरळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले 11वी व 12वी विज्ञान शाखेत शिकत असताना विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना अनेक शासकीय योजना असल्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या माध्यमातून आपल्या शिक्षणाचा आर्थिक हातभार लागू शकतो असे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून येळवीचे ज्येष्ठ नागरिक मा.पंचाक्षरी अंकलगी(काका) उपस्थित होते, याबरोबर तानाजी चव्हाण सर,ग्रामीण विकास संस्थेचे विवेक टेंगले, येळवीचे माजी उपसरपंच सुनील अंकलगी, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं. सदस्य संतोष पाटील,नवनाथ पवार, प्राचार्य भारत निळे सर ,शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफ उपस्थितीत होता...

## स्वातंत्र्यदिन साजरा करताना ...



ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेच्यावतीने 77 वा स्वतंत्र दिन उत्साहात साजरा.... प्रशालेचे ध्वजारोहण संस्थेच्या संचालिका येळवीच्या सरपंच मा. सौ. आरती सुनिल अंकलगी यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी येळवीतील प्रतिष्ठित नागरिक तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करताना ...





ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी.ता.जत येथे रक्षाबंधनाचा पवित्र सण साजरा करण्यात आला यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले विद्यार्थिनीने हाताने बनवलेल्या राख्या विद्यार्थ्यांना बांधून हा सण साजरा करण्यात आला....

## वन भोजन - एक शैक्षणिक उपक्रम ...





ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी, ता.जत. प्रशालेचे वनभोजन आज कोळगिरी ता.जत. "भैरवनाथ मंदिर" येथे नेण्यात आले होते. जत तालुक्यातील नैसर्गिक ठिकाण त्याचबरोबर आनेक झाडा-झुडपांच्या मध्यस्थी भैरवनाथाचे मंदिर या ठिकाणी डोंगर, धबधबा असे नैसर्गिक ठिकाण.

प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी या निसर्गरम्य ठिकाणी अनेक खेळ खेळले, त्याचबरोबर म्युझिक गाणी, गोष्टी, गप्पा, डान्स आशा मनोरंजनात्मक गोष्टीतून छानसा वनभोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला...

# तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचे आयोजन ...






ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी.ता.जत येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार मा. विक्रमसिंह (दादा) सावंत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता मा. अनिल अंकलगी (साहेब) त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून जतचे तहसीलदार मा.जीवन बनसोडेसो,जत प.सं. माजी सभापती बाबासाहेब (तात्या) कोडग,जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा.आप्पासाहेब सरगर, गटशिक्षणाधिकारी मा.अन्सार शेख सर, येळवीच्या सरपंच सौ.आरती अंकलगी, माजी उपसरपंच सुनील अंकलगी ,संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, येळवी सर्व सेवा.सोसा. चेअरमन मा.संतोष स्वामी, उपसरपंच मा. विश्वास खिलारे, प्राचार्य मा. भारत निळे (सर) ,क्रीडा शिक्षक आदि उपस्थितीत होते.....

यावेळी आमदार मा. विक्रमसिंह (दादा) सावंत म्हणाले,. मन, मेंदू आणि मनगट यांचा सुरेख मेळ साधत खेळला जाणारा कबड्डी हा महत्त्वपूर्ण खेळांपैकी एक मैदानी खेळ आहे. आजकाल सोशल मीडियाच्या नादाने विद्यार्थी मोठ्या संख्येने मैदानी खेळापासून दूर चालले आहेत हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे. अशा स्पर्धांच्या आयोजनाने मैदानी खेळाप्रती विद्यार्थ्यांच्यात गोडी निर्माण करणे आवश्यक असल्याचं याप्रसंगी नमूद केलं.

या कबड्डीच्या स्पर्धेसाठी एकूण 184 संघानी जत तालुक्यातून उपस्थिती नोंदवली होती.

स्पर्धेचे नेटके नियोजन : ओंकार स्वरूपा संस्थेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे नेटके नियोजन केल्याबद्दल संस्थेचे सचिव संतोष पाटील यांचा जत तालुका क्रीडा संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष एम.ए.शेख (सर) यांच्या हस्ते उत्कृष्ट नियोजनाबद्दल सत्कार करण्यात आला....

ही स्पर्धा पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक भारत निळे (सर), शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.





**नवराष्ट्र**

क्रीडा • ओंकार स्वरूपा संस्थेतर्फे आयोजन; अंकलेचे सिद्धनाथ विद्यामंदिर, काराजनगी शाळेचा प्रथम क्रमांक

# जत तालुका शालेय कबड्डी स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**जत**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी (ता.जत) येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्‌घाटन आमदार विक्रमसिंह सावंत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून जतचे तहसीलदार जीवन बनसोडेसो, जत प.सं. माजी सभापती बाबासाहेब कोडग, जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आप्पासाहेब सरगर, गटशिक्षणाधिकारी अन्सार शेख, येळवीच्या सरपंच आरती अंकलगी, माजी उपसरपंच सुनील अंकलगी, संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी, येळवी सर्व सेवा.सोसा. उपसरपंच विश्वास खिलारे, प्राचार्य भारत निळे, क्रीडा शिक्षक आदि उपस्थितीत होते.



## खेळाप्रती विद्यार्थ्यांत आवड निर्माण करणे आवश्यक

यावेळी आमदार सावंत म्हणाले, मन, मेंदू आणि मनगट यांचा सुरेख मेळ साधत खेळला जाणारा कबड्डी हा महत्त्वपूर्ण खेळांपैकी एक मैदानी खेळ आहे. आजकाल सोशल मीडियाच्या नादाने विद्यार्थी मोठ्या संख्येने मैदानी खेळापासून दूर चालले आहेत हे कुठेतरी थांबणे गरजेचे आहे. अशा स्पर्धांच्या आयोजनाने मैदानी खेळाप्रती विद्यार्थ्यांच्यात गोडी निर्माण करणे आवश्यक असल्याचं याप्रसंगी नमूद केले.

## स्पर्धेचे नेटके नियोजन

ओंकार स्वरूपा संस्थेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे नेटके नियोजन केल्याबद्दल संस्थेचे सचिव संतोष पाटील यांचा जत तालुका क्रीडा संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष एम.ए.शेख (सर) यांच्या हस्ते उत्कृष्ट नियोजनाबद्दल सत्कार करण्यात आला.

ही स्पर्धा पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक भारत निळे सर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे:-**

**१४ वर्षे वयोगट (मुले) विजयी संघ :**
- प्रथम क्रमांक:- श्री सिद्धनाथ विद्यामंदिर, अंकले
- द्वितीय क्रमांक:-सिद्धनाथ हायस्कुल & ज्युनि. कॉलेज वाळेखिंडी.

**१४ वर्षे वयोगट (मुली) विजयी संघ :**
- प्रथम क्रमांक:- जिल्हा परिषद शाळा, काराजनगी
- द्वितीय क्रमांक:- संत तुकाराम विघ्यामंदीर, हिवरे.

**१७ वर्षे वयोगट(मुले) विजयी संघ:**
- प्रथम क्रमांक:-एम .व्ही. हायस्कुल & ज्युनि. कॉलेज, उमदी ता. जत
- द्वितीय क्रमांक:-ओंकार स्वरुपा इंग्लिश मिडियम स्कुल अँड ज्युनि. कॉलेज येळवी.

**१७ वर्षे वयोगट (मुली) विजयी संघ :**
- प्रथम क्रमांक:- राजे रामराव महाविदयालय, जत.
- द्वितीय क्रमांक:- श्री हनुमान न्यू इंग्लिश स्कुल वळसंग.

**१९ वर्षे वयोगट (मुले) विजयी संघ**
- प्रथम क्रमांक:-राजे रामराव महाविदयालय, जत ता. जत
- द्वितीय क्रमांक:- गजानन हाय. & ज्युनि. कॉलेज जाडरबोबलाद .

**१९ वर्षे वयोगट (मुली) विजयी संघ :**
- प्रथम क्रमांक:-एस. व्ही. आर. डी शेगाव.
- द्वितीय क्रमांक:-चंद्रशेखर गोबी हाय व ज्युनि का तिकोंडी

Paschim Maharashtra Plus Edition
13 September 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com

---

**पुण्यनगरी**

# येळवीत ओंकारस्वरूपाच्या मैदानात रंगल्या कबड्डी स्पर्धा

**१८४ संघांचा सहभाग; नेटक्या नियोजनामुळे क्रीडाप्रेमींचा आनंद द्विगुणित**

**जत / प्रतिनिधी**

तालुक्यातील येळवी येथील ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्था संचलित ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या मैदानात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा रंगल्या.

क्रीडा युवक सेवा संचनालय, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद सांगली व येळवी येथील ओंकारस्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. येळवीत प्रथमच ओंकारस्वरूपाने या स्पर्धा भरविल्या होत्या. दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत विविध गटातील १८४ संघानी सहभाग नोंदविला होता.

ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक अंकलगी, येळवी ग्रामपंचायतचे सदस्य तथा ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्थेचे सचिव संतोष पाटील यांच्यासह ओंकारस्वरूपा टीमने अतिशय नेटके नियोजन या स्पर्धेसाठी केले होते. स्पर्धेसाठी चार मुख्य मैदाने तयार करण्यात आली होती. प्रेक्षकांना सर्व सामने पाहता यावीत यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. १८४ संघामध्ये सहभागी झालेली विद्यार्थी, त्यांचे क्रीडा प्रशिक्षक व स्पर्धा पाहण्यासाठी आलेले प्रेक्षक यांनी ओंकारस्वरूपाने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. ओंकारस्वरूपा संस्थेने तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे नेटके नियोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी व सचिव संतोष पाटील यांचा जत तालुका क्रीडा संघटनेच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष एम. ए. शेख यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.



जत : विजेत्या संघाला बक्षीस वितरण करताना मुंबई येथील म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी, तहसीलदार जीवन बनसोडे, दीपक अंकलगी, संतोष पाटील आदी. कबड्डी लढतीतील क्षण.

या स्पर्धेचे उद्‌घाटन आमदार विक्रमसिंह सावंत यांच्याहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई येथील म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी होते. प्रमुख पाहुणे म्हणून जतचे तहसीलदार जीवन बनसोडे, बाबासाहेब कोडग, पंचाक्षरी अंकलगी, जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आप्पासाहेब सरगर, गटशिक्षणाधिकारी अन्सार शेख, येळवीच्या सरपंच आरतीताई अंकलगी, उपसरपंच विश्वास खिलारे, माजी उपसरपंच सुनील अंकलगी, सुनील साळे, सचिन माने, येळवी सोसायटीचे चेअरमन संतोष स्वामी, ज्ञानेश्वर आवटे, रविकिरण पवार, डॉ. विवेकानंद स्वामी, ओंकारस्वरूपाचे प्राचार्य भारत निळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात मैदानी खेळाकडे होणाऱ्या दुर्लक्षाचे परिणाम सर्वांना भोगावे लागणार आहेत. शालेय जीवनात मैदानी खेळाची गोडी निर्माण व्हावी यासाठी विशेष प्रयत्न करणे काळाची गरज असल्याचे सांगितले.

Smart Sangli Edition
Sep 13, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

---

**पुढारी**

# कबड्डीत जत, अंकले, उमदी प्रशालांचे यश

**जत : पुढारी वृत्तसेवा**

येळवी (ता.जत) येथे ओंकार स्वरूपा इंग्लिश स्कूलमधील तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्री सिद्धनाथ विद्यामंदिरच्या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षे वयोगटात उमदीचे एम.व्ही. हायस्कूल कॉलेज, १९ वर्षे वयोगटात जतच्या राजे रामराव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली. तालुक्यातून १८४ संघाने सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे उद्‌घाटन आमदार विक्रमसिंह सावंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी होते. तहसीलदार जीवन बनसोडे, माजी सभापती बाबासाहेब कोडग. गटविकास अधिकारी आप्पासाहेब सरगर, अन्सर शेख, सरपंच आरती अंकलगी, सुनील अंकलगी, संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी, संतोष स्वामी, उपसरपंच विश्वास खिलारे उपस्थित होते.

१४ वर्षे वयोगटात वाळेखिंडीचे सिद्धनाथ हायस्कूल कॉलेज द्वितीय, मुलींत काराजनगीची जिल्हा परिषद शाळा, द्वितीय, १७ वर्षे (मुले) ओंकार स्वरुपा इंग्लिश स्कूल द्वितीय, मुलींमध्ये जतचे राजे रामराव महाविद्यालय प्रथम, वळसंगचे श्री हनुमान न्यू इंग्लिश स्कूल द्वितीय आले.१९ वर्षे वयोगट जाडरबोबलादचे गजानन हायस्कूल व कॉलेज द्वितीय, मुलींमध्ये शेगावचे एस. व्ही. आर. डी प्रथम, तिकोंडीच्या चंद्रशेखर गोबी हायस्कल द्वितीय.

My Sangli Edition
Sep 19, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



## गणेशोत्सव साजरा ...



ओंकार स्वरूपा फाउंडेशन संस्थेच्या वतीने गेली 30 वर्ष गणेशोत्सव साजरा केला जातो. गणेश उत्सवा दरम्यान अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. 30 वर्षापासून मा. दीपक (आण्णा) अंकलगी यांच्या नेतृत्वाखाली हे मंडळ धार्मिक, सामाजिक भावना जपत गणेशोत्सव साजरा करत आहे. ओंकार स्वरूपाने आपले स्थान येळवी करांच्या हृदयात कायम कोरले आहे.

## नवरात्रोत्सव, येळवी ...



नवरात्र उत्सवानिमित्त 'श्री अंबाबाई देवी' ची ज्योत अंबाबाई डोंगर जत येथून आणण्यात आली. मानाची ज्योत आण्यासाठी येळवी गावातून अनेक नागरीक व ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्थेचे कार्यकर्ते

## आंतरशालेय क्रीडा स्पर्धा ...



पुण्यनगरी

'ओंकारस्वरूपा'मध्ये शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात

Smart Sangli Edition
Dec 14, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com





ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था येळवी संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या प्रशालेच्या अंतर्गत शालेय स्पर्धेचे उद्घाटन निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख मा. शहाजी साळुंखे (सर) यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी संबंध केंद्राचे केंद्रप्रमुख सुखदेव शिंदे सर संस्थेचे अध्यक्ष मा. दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य मा. संतोष पाटील, प्राचार्य मा. भारत निळे (सर), क्रीडाशिक्षक करीमसो नाईक(सर), तसेच शिक्षक शिक्षकेत्तर स्टाफ उपस्थित होता.

या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये 100 मीटर / 200मीटर धावणे, खो-खो, कबड्डी, थाळीफेक, गोळाफेक, रस्सीखेच, या स्पर्धेमध्ये एल. के. जी, यु. के. जी, पासुन इयत्ता 1ली ते 5 वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत क्रीडा स्पर्धेत रंगत भरली.

## फॅन्सी ड्रेस कॉम्पिटीशन ...



ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल
अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता.जत.
Fancy Dress competition 2023-24

## शैक्षणिक सहल ...



ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या प्रशालेची माध्यमिक विभागाची सहल रायगड, महाड गणपती, पाली गणपती, जंजिरा किल्ला, दिवेआगार बीच, प्रतापगड, महाबळेश्वर, या ठिकाणी जाऊन आली. शैक्षणिक वर्ष 2023-24 यंदाच्या शैक्षणिक सहलीमुळे अनेक गड किल्ले आणि निसर्गरम्य ठिकाण विद्यार्थ्यांना पाहता आली....



## अभ्यास दौरा ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येळवी येथील विज्ञान शाखेमधील इ.12 वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनीची शैक्षणिक सहल संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मिरज येथे नेहण्यात आली होती.

यामध्ये इंजिनिअरिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना उपलब्ध होणारी संधी, इंजिनिअरिंग मधील विविध ट्रेड, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले......






## प्रजासत्ताक दिन साजरा ...






ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी येथे 75 वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. येळवीच्या लोकनियुक्त महिला सरपंच सौ.आरती अंकलगी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले.

## निरोप समारंभ ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल ज्युनियर कॉलेज येळवी, ता.जत. इयत्ता 12 वीचा सन 2023- 24 निरोप समारंभ झाला. भैरवनाथ हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज दरीबडचीचे प्रा. मा. मनोहर चौगुले सर, माळी सर, जाधव सर, उपस्थितीत होते. यावेळी प्रा. मनोहर चौगुले सर म्हणाले, विद्यार्थ्याला जर यशस्वी व्हायचे असेल तर कष्टाची जोड दिली पाहिजे, भविष्यातील ध्येय ठरवून अभ्यासाला लागा. येणाऱ्या संकटावरती अडचणी वरती मात करण्याची सहनशीलता ठेवा. आयुष्यात निश्चित ध्येय प्राप्ती होईल व यशस्वी व्हाल.



# ओंकार स्वरुपा फेस्टिव्हल ...






ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येळवी या प्रशालेचा ओंकार स्वरूपा फेस्टिव्हल 2024 उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता मा.अनिल अंकलगी साहेब होते, तसेच कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणून जत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मा.अनसर शेख साहेब होते.तसेच निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख शहाजी साळुंखे सर, सनमडी केंद्राचे केंद्रप्रमुख सुखदेव शिंदे (सर), सेवानिवृत्त आर.टी.ओ शिवाजीराव माने,मंगळवेढा मार्केट कमिटीचे संचालक जगन्नाथ रेवे, जय मल्हार फाउंडेशन जतचे अध्यक्ष हेमंत चौगुले, येळवीच्या सरपंच सौ. आरतीताई अंकलगी, येळवी सर्व.सेवा.सोसा. चेअरमन संतोष स्वामी, संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील, शंकराव पाटील, विजय कदम, प्राचार्य भारत निळे (सर), शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते...

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, लोकगीते, रिमिक्स गीते अशा एकूण 33 मराठी हिंदी गाण्यावर विविध कलाविष्कार सादर केला....

प्रशालेतील विद्यार्थी कु.सारिका इंगोले व कु.हर्षद चोरमुले यांनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत विविध यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला...











पुण्य नगरी

## ओंकारस्वरुपा कॉलेज ग्रामीण भागात इतिहास घडवेल

**अनिल अंकलगी**

**जत / प्रतिनिधी**

येळवी येथील ओंकारस्वरुपा फौंडेशन संस्था संचलित ओंकारस्वरुपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ग्रामीण भागात गुणवत्तेच्या बाबतीत इतिहास घडवेल, असा विश्वास म्हाडाचे उपकार्यकारी अभियंता अनिल अंकलगी यांनी व्यक्त केला.

ओंकारस्वरुपा स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्यावतीने यंदाही ओंकारस्वरुपा फेस्टिव्हल-२०२४ चे आयोजन केले होते. अध्यक्षतस्थानी अनिल अंकलगी होते. उद्घाटन गटशिक्षणाधिकारी अन्सर शेख, जय मल्हार फौंडेशनचे हेमंत चौगुले, शिवाजीराव माने, सरपंच आरतीताई अंकलगी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी शहाजी साळुंखे, सुखदेव शिंदे, जगन्नाथ रेवे, संतोष स्वामी, उपसरपंच विश्वास खिलारे, संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी, सचिव संतोष पाटील, शंकराव पाटील, विजय कदम, प्राचार्य भारत निळे उपस्थित होते.

अनिल अंकलगी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच आपल्या अंगातील कलागुणांना वाव द्या, असे आवाहन केले.

येळवी : ओंकारस्वरुपा फेस्टिवल उद्घाटनप्रसंगी अनिल अंकलगी, अन्सर शेख, सरपंच आरतीताई अंकलगी, हेमंत चौगुले, दीपक अंकलगी, संतोष पाटील, शेखर पाटील आदी.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून कौतुक

ओंकारस्वरुपा फौंडेशनचे कार्य उल्लेखनीय आहे. दोन वर्षात संस्थेने शैक्षणिक गुणवत्तेतही नावलौकीक मिळवला आहे. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे नियोजन करुन संस्थेने क्रीडाप्रेमींची मने जिंकली. ग्रामीण भागात सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांनी केलेल्या नियोजनाला तोड नसल्याचे कौतुक करत ओंकारस्वरुपाचा भविष्यकाळ एक नंबर असल्याचे सागितले.

Smart Sangli Edition
Jan 28, 2024 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## इयत्ता १० वीचा निरोप समारंभ ...




ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता.जत. या प्रशालेचा इयत्ता 10 वीचा निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.विक्रांतजी पवार (युवा उद्योजक) उपस्थित होते. प्रशालेची इयत्ता 10 वीची पहिलीच बॅच यावेळेस परीक्षेस सामोरे जात आहे. यानिमित्त त्यांना मार्गदर्शन व परीक्षेस शुभेच्छा दिल्या.

## इयत्ता दहवीचा निरोप समारंभ ...

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था येळवी संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवीच्या वतीने इयत्ता 10 वीतील विद्यार्थ्यांना "मोफत क्रॅश कोर्स" चालू करण्यात येत आहे तरी येळवी व येळवी परिसरातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा....




## संक्रांतीनिमित्त - महिला गटशेती विषयी माहिती ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता. जत येथे महिलांसाठी संक्रांती निमित्त हळदी-कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

गावातील सर्व महिलांनी याचा लाभ घेतला. प्रसंगी पाणी फौंडेशन, सत्यमेव जयते फार्मर स्पर्धा २०२४ महिला शेतकरी गटशेती विषयी माहिती देण्यात



## ‘किंडरगार्टन’ कार्यक्रम संपन्न ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता.जत येथे यु.के.जी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा अंगणवाडी कोर्स पूर्ण केल्याबद्दल "Kindergarten" हा कार्यक्रम संपन्न झाला.



## समर व्हेकेशन, MS-CIT कोर्स ...








ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता.जत येथे MS-CIT कोर्सला सुरुवात करण्यात आली.